# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:26.05.2026** **वार:मंगळवार**

---

1. राष्ट्रपतींच्या हस्ते नवी दिल्लीत 66 मान्यवरांना पद्म सन्मान प्रदान; राज्यातल्या आठ मान्यवरांचा सन्मान
2. देशाची अर्थव्यवस्था अंतर्गत पातळीवर मजबूत; मात्र आंतरराष्ट्रीय स्तरावरील भूराजकीय आणि आर्थिक संघर्षामुळे नवनवी आव्हानं निर्माण होत असल्याचं अर्थमंत्री सीतारामन यांचं प्रतिपादन
3. राज्य शासनाचा अग्रेको इंडिया या ऊर्जा कंपनीशी सामंजस्य करार, पुण्यात पुढच्या दहा वर्षांत चारशे कोटी रुपयांची गुंतवणूक होणार
4. नाशिकच्या कांद्याला केंद्र सरकारकडून 1 हजार 580 रुपयांचा भाव निश्चित आणि
5. राज्यात गेल्या दोन दिवसात झालेल्या रस्ते अपघातात 18 जणांचा मृत्यू

**<u>पद्म वितरण</u>**

राष्ट्रपती भवनात आयोजित कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते काल यंदाचे पद्म सन्मान प्रदान करण्यात आले. पद्म पुरस्कार वितरणाच्या पहिल्या टप्प्यातील सोहळ्यात राष्ट्रपतींनी 66 मान्यवरांना 'पद्म' पुरस्कारांनी सन्मानित केलं. यात दोन 'पद्मविभूषण', सहा 'पद्मभूषण' आणि 58 'पद्मश्री' पुरस्कारांचा समावेश आहे. राज्यातील आठ मान्यवरांना काल 'पद्म' सन्मान प्रदान करण्यात आले. उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा यावेळी उपस्थित होते. कालच्या सोहळ्यात ख्यातनाम अभिनेते धर्मेंद्रसिंह देओल यांना त्यांच्या कला क्षेत्रातील योगदानाबद्दल मरणोत्तर पद्मविभूषण देऊन सन्मानित करण्यात आलं. त्यांच्या पत्नी आणि लोकसभेतील खासदार हेमा मालिनी यांनी हा सन्मान स्वीकारला.

महाराष्ट्राचे माजी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांना पद्मभूषण प्रदान करण्यात आला. पद्मभूषण देऊन सन्मानित करण्यात आलेल्या राज्यातील मान्यवरांमध्ये उदय कोटक आणि पियूष पांडे यांचा समावेश आहे. पियूष पांडे यांना मरणोत्तर हा सन्मान प्रदान करण्यात आला.

परभणी इथले कृषीसेवक श्रीरंग देवबा ऊर्फ दादा लाड, अमरावती इथल्या श्री गुरुदेव सेवा मंडळाचे सरचिटणीस जनार्दन पंत बोथे गुरुजी यांना पद्मश्री पुरस्कारानं गौरवण्यात आलं.

हा पुरस्कार स्वीकारल्यानंतर बोथे गुरुजींनी व्यक्त केलेली प्रतिक्रिया.....

**भारत सरकारने मला माझ्या नावाने पद्मश्री पुरस्कार दिला आहे तो खरं म्हणजे माझं नाव एक पोस्टासारखं आहे पोस्ट एड्रेस जसं असते पण तो सर्व राष्ट्रवंताने निर्माण केलेल्या अखिल भारतीय गुरुदेव शंडळाच्या प्रचारकांचा हा त्यांच्या विचाराचा चालणाऱ्या लोकांचा सर्वांचा हा पुरस्कार त्यांना मिळाला आहे असं मी सांगतो. अखिल भारतीय गुरुदेव शाम काम करता करता करणारी जी गेलेली मंडळी आहेत जीव जिवंत मंडळी आजच्या घडीला त्यांनीही मोठं काम आज सुरू ठेवलेलं आहे हा सर्व त्यांच्यासाठी हा भगवटोपीचा एक सन्मान आहे असं मी समजतो आणि त्यांच्यासाठी हा पुरस्कार त्यांच्यासाठी मी अर्पण केला असं मी समजतो.**

पद्मश्री पुरस्कारांनं गौरवण्यात आलेल्या इतर मानकऱ्यांमध्ये रामचंद्र आणि सुनिता गोडबोले, तमाशा कलावंत रघुवीर खेडकर, क्रिकेटपटू हरमनप्रीत कौर, दिव्यांग ॲथलीट प्रवीण कुमार यांचा समावेश आहे.

यंदा पाच 'पद्मविभूषण', 13 'पद्मभूषण' आणि 113 'पद्मश्री' पुरस्कारांसह एकंदर 131 मान्यवरांना 'पद्म' सन्मान जाहीर झाले आहेत. उर्वरित 'पद्म' पुरस्कार विजेत्यांना, नंतर आयोजित केल्या जाणाऱ्या समारंभाच्या दुसऱ्या टप्प्यात हे पुरस्कार प्रदान केले जातील.

**<u>सीतारामन-मुंबई</u>**

देशाची अर्थव्यवस्था अंतर्गत पातळीवर मजबूत आहे, मात्र आंतरराष्ट्रीय स्तरावरील भूराजकीय आणि आर्थिक संघर्षामुळे नवनवी आव्हानं निर्माण होत आहेत असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. सिडबी अर्थात भारतीय लघु उद्योग विकास बँकेच्या वर्धापनदिनानिमित्त मुंबईत आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. पश्चिम आशियात संघर्ष सुरू झाल्यानं खतं, सोनं, इंधन या सर्व उत्पादनांचे आंतरराष्ट्रीय बाजारातले दर कडाडले आहेत, त्यामुळे देशाच्या परकीय चलनसाठ्यावर ताण येत आहे.

अशा परिस्थितीत खतांचा वापर कमी करावा, इंधनाची काटकसर करावी, परदेशप्रवास आणि सोने खरेदी शक्यतो करु नये, असं आवाहन पंतप्रधानांनी केलं आहे. त्याबाबत विरोधक अपप्रचार करत असल्याचं त्या म्हणाल्या. सध्याच्या आव्हानावर मात करण्यासाठी सरकारनं केलेल्या उपाययोजनांची माहिती त्यांनी दिली. यावेळी विविध लाभार्थींना उद्योग व्यवसायांच्या वाढीसाठी सीतारामन यांच्या हस्ते अर्थ सहाय्य वितरित करण्यात आलं.

**<u>सामंजस्य करार</u>**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत काल राज्य शासन आणि अग्रेको इंडिया या ऊर्जा कंपनीदरम्यान सामंजस्य करार करण्यात आला. या करारानुसार पुढील दहा वर्षांत पुण्यात सुमारे चारशे कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येणार असून त्यामुळे एक हजारांहून अधिक थेट रोजगार निर्माण होणार आहेत. त्यासाठी या कंपनीला उत्कृष्ट कार्यपरिसर मिळण्याबरोबरच आवश्यक सर्व सहकार्य केलं जाईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.
अग्रेको इंडिया ही कंपनी ऊर्जा आणि तापमान नियंत्रण उपाययोजना या क्षेत्रात कार्यरत आहे. काल झालेल्या करारानुसार कंपनीतर्फे पुणे जिल्ह्यातील फुलगाव इथं अत्याधुनिक जागतिक अभियांत्रिकी आणि उत्पादन केंद्र उभारलं जाणार आहे; त्याचं काम याच वर्षी सुरु होणार आहे.

**<u>नाशिक</u>**

बाजारातील अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर, शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी कांद्याला 1 हजार 580 रुपये प्रति क्विंटल असा किमान आश्वासित खरेदी दर देण्याचं केंद्र सरकारनं जाहीर केलं आहे. हा दर सध्या फक्त नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी असेल.
गेल्या दीड महिन्यापासून कांद्याला क्विंटलमागे केवळ एक हजार ते बाराशे रुपयांचा भाव मिळत होता. कांद्याचे भाव कोसळल्याने नाशिक जिल्ह्यात ठिकठिकाणी आंदोलनं होत होती. रविवारी काही ठिकाणी कांद्याचा भाव 13शे ते 13 शे 50 पर्यंत पोहोचला होता; त्यानंतर काल केंद्र सरकारने एक परिपत्रक जारी करत 26 मे पासून नाशिक जिल्ह्यातील कांद्याला 1 हजार 580 रुपयांचा दर देण्याचं जाहीर केलं.

**<u>नीट कोठडी-मुंबई</u>**

नीट पेपरफुटी प्रकरणी अटकेत असलेल्या प्राध्यापक मनिषा हवालदार यांना दिल्लीच्या राऊज अव्हेन्यू न्यायालयाने सहा दिवसांची सीबीआय कोठडी दिली आहे. मनिषा हवालदार यांना 22 मे रोजी अटक करण्यात आली होती.

दरम्यान नीट परीक्षेच्या आयोजनात वारंवार त्रुटी राहत असल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयानं काल चिंता व्यक्त केली. याआधी पेपरफुटी होऊनही एनटीए नं त्यापासून काहीच धडा घेतला नाही हे खेदजनक आहे, अशी टिप्पणी न्यायालयानं केली. वैद्यकीय प्रवेश परीक्षा घेण्यासाठी एनटीए ऐवजी दुसऱ्या स्वायत्त संस्थेची स्थापना करावी, अशी

मागणी करणाऱ्या याचिकेवरल्या सुनावणीवेळी न्यायाधीश न्यायमूर्ती पी. एस. नरसिंहा आणि न्यायमूर्ती आलोक आराधे यांच्या खंडपीठाने ही टिप्पणी केली.

**इंधनसाठा आढावा**

राज्यात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असून कोणत्याही प्रकारची इंधनटंचाई नसल्याचं अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी स्पष्ट केलं. काही भागांत अफवांमुळे नागरिकांकडून अतिरिक्त इंधन खरेदी होत असल्याने पेट्रोल-डिझेल विक्रीत लक्षणीय वाढ झाली आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरून अनावश्यक साठा करू नये, असं आवाहनही मंत्री भुजबळ यांनी केलं आहे.

राज्यातील पेट्रोल-डिझेल वितरणाबाबत मंत्रालयात घेण्यात आलेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

**अमराठी चालक धडे**

राज्यातील अमराठी रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी भाषा सहज समजावी, बोलता यावी आणि दैनंदिन व्यवहारात प्रभावीपणे वापरता यावी यासाठी परिवहन विभागामार्फत व्यापक मराठी शिक्षण अभियान राबविण्यात येणार असल्याचं परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितलं. या उपक्रमात रिक्षा-टॅक्सी संघटनांनी सक्रिय सहभाग घेऊन पुढाकार घ्यावा, असं आवाहनही त्यांनी केलं. राज्यातील विविध रिक्षा आणि टॅक्सी संघटनांच्या प्रतिनिधींसमवेत मंत्रालयात काल विशेष बैठकीचं आयोजन करण्यात आलं होतं. त्यावेळी ते बोलत होते.

**अपघात-रायगड-धुळे**

राज्यात गेल्या दोन दिवसात झालेल्या वेगवेगळ्या अपघातात अठरा जणांचा मृत्यू झाला. महाबळेश्वर-पोलादपूर मार्गावरील आंबेनळी घाटात काल पहाटे एक वाहन 800 फूट खोल दरीत कोसळून झालेल्या भीषण अपघातात 8 जणांचा मृत्यू झाला. कोकणात फिरायला गेलेले सातारा जिल्ह्यातले आठ जण परतत असताना वाहन चालकाचा ताबा सुटून हा अपघात झाला.

दुसरा अपघात मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावर धुळे तालुक्यातल्या लळिंग घाटात झाला. भरधाव रेतीचा डंपर समोरुन येणाऱ्या ट्रकला धडकल्यानं, ट्रकच्या मागून आलेले वाहनही ट्रकला धडकलं. या अपघातात पाच जण जागीच ठार झाले, या अपघातात मदतकार्य करणारा एक टोल कामगारही मरण पावला; या दुर्घटनेत पंचवीस जण जखमी झाले.

तर पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यात डिंगोरे इथे रविवारी रात्री एसटी बस आणि दुचाकीची धडक झाली; यात दुचाकीवरील 4 तरुणांचा मृत्यू झाला.

**हवामान**

येत्या दोन दिवसात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. तर विदर्भात तुरळक ठिकाणी उष्णतेची तीव्र लाट येण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.